# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- प्र.स.क्र. ०३ च्या कार्यक्षेत्रातील पद्मानगर, भाग्यनगर, कामतघर, फेणे व अंजुरफाटा परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पद्धतीने सुधारणा करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **प्र.स.क्र. ०३ च्या कार्यक्षेत्रातील पद्मानगर, भाग्यनगर, कामतघर, फेणे व अंजुरफाटा परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पद्धतीने सुधारणा करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९९,३९५/-) या कामाची बी-१ प्रकारची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. २२६/२०२२-२३ (ऑनलाईन टेंडर क्र. ८८१८९१) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या w.w.w.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सदर कामासाठी ई-निविदा मागविणेत आल्या आहेत. सदर कामासाठी एकुण पात्र ०२ निविदांपैकी **मे. तुषार मोहन चौधरी, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५१% दराने कमी असुन त्यानुसार कामाची रक्कम रु. ४९,७३,८९८/- ( **GST** सह) येत आहे.

**मे. तुषार मोहन चौधरी, भिवंडी.** यांची प्राकलन दरापेक्षा ०.५१% कमी दराची निविदा रक्कम रु. ४९,७३,८९८/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख त्र्याहत्तर हजार आठशे अठ्ठयान्नव रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक ११/०४/२०२३ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासक मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ९५०　　　　　　　　　　　　**दिनांक :-**२६/४/२०२३

**प्र.स.क्र. ०३ च्या कार्यक्षेत्रातील पद्मानगर, भाग्यनगर, कामतघर, फेणे व अंजुरफाटा परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पद्धतीने सुधारणा करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. तुषार मोहन चौधरी, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५१% कमी दराची म्हणजेच रक्कम रु. ४९,७३,८९८/- (अक्षरी रु. एकोणपन्नास लाख त्र्याहत्तर हजार आठशे अठ्ठयान्नव रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,

कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषःत कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, **प्र.स.क्र. ०३ च्या कार्यक्षेत्रातील पद्मानगर, भाग्यनगर, कामतघर, फेणे व अंजुरफाटा परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पद्धतीने सुधारणा करणे** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. तुषार मोहन चौधरी, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका